# BDC LIBRARY

## New Paper Clipping

**A.Y. 2024-2025**

नवराष्ट्र

प्रकाशन : कोयना शिक्षण संस्थेचे संचालक संजीव चव्हाण यांचे मत

# ‘कोयनातीर’ सृजनशक्तीचे व्यासपीठ

पाटण, (वा.) विद्यार्थ्यांनी चांगले वाचन केले तर चांगले लिहू शकतात. कोयनातीर नियतकालिक हे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांच्यातील सृजनशील लेखनाला वाव देण्यासाठीचे व्यासपीठ आहे, असे मत कोयना एज्युकेशन शिक्षण संस्थेचे संचालक व पाटण रोटरी क्लबचे अध्यक्ष संजीव चव्हाण यांनी व्यक्त केले. ते येथील बाळासाहेब देसाई महाविद्यालयात कोयनातीर या नियतकालिकाच्या प्रकाशन कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.डी.पवार होते.



## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव

प्राचार्य पवार म्हणाले की, विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालय विविध उपक्रम राबवीत असते त्यामधील एक महत्वाचा उपक्रम म्हणजे कोयनातीर हे नियतकालिक होय. कॉलेजच्यावतीने दरवर्षी नियतकालिक प्रकाशित केले जाते.

प्रमुख पाहुण्याच्या हस्ते अंकाचे प्रकाशन करण्यात आले. कोयनातीर नियतकालिकाचे मुख्य संपादक प्रा. डॉ. विनायक राऊत, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. सौ. एच. व्ही. काटे, जुनियर विभागाचे पर्यवेक्षक प्रा. दीपक दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. श्रीनिवास पवार यांनी सूत्रसंचालन केले.

Paschim Maharashtra Plus Edition Edition
Jul 06, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com